# अमरावती महानगरपालिका अमरावती
## पशुवैद्यक विभाग
## सुचना

अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रात मास विक्री तथा जनावरांची कत्तल करणाऱ्या व्यवसायाची विनियमन उपविधी २०१७ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४५८ पोटकलम (२६), (२७), (२८), (२९) व ४५९, ४६०, ४६१, ४६२, ४६३ अन्वये उपविधीचे प्रारुप तयार करण्यात आलेले आहे. सबब सदर प्रारुप उपविधीच्या अनुषंगाने काही हरकती किंवा सुझाव द्यावयाचे असल्यास त्यांनी ही प्रारुप उपविधी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ते एका महिन्याच्या कालावधीत आपल्या हरकती किंवा सुझाव कृपया महापालिकेच्या पशुवैद्यक विभाग येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधुन लेखी स्वरुपात देण्याचे करावे. या तारखेनंतर आलेल्या हरकतींचा किंवा सुझावांचा विचार केला जाणार नाही. सदर उपविधीचे प्रारुप महानगरपालिकेच्या पशुवैद्यक कार्यालयासह सर्व झोन कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले आहे. तसेच सदर उपविधीची सॉफ्ट कॉपी महानगरपालिकेच्या www.amtcorp.org या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

कृपया माहीती तथा सहकार्याकरीता सादर.

पशुशल्यचिकित्सक
महानगरपालिका, अमरावती

आयुक्त
महानगरपालिका, अमरावती

# अमरावती महानगरपालिका,अमरावती

## उपविधी

### अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रात मासं विक्री तथा जनावरांची कत्तल करणाऱ्या व्यवसायाची विनियमन उपविधी २०१७

❖ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४५८ पोटकलम (२६), (२७), (२८), (२९) व ४५९, ४६०, ४६१, ४६२, ४६३ अन्वये.

**भाग - एक**

**१.१. संक्षिप्त नामानिधान**

अ) हे उपविधी अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रात मास विक्री तथा जनावरांची कत्तल करणाऱ्या व्यवसायाची उपविधी २०१७ या नावाने संबोधण्यात येईल.

ब) हे उपविधी अमरावती महानगरपालिका क्षेत्रात लागू राहील.

क) हे उपविधी शासकीय राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन अंमलात येतील.

१.२. व्याख्या

**अ) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या नियमात -**

१) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

२) "नमुना" म्हणजे नियमास जोडलेला नमुना.

३) "महानगरपालिका" म्हणजे शहराची महानगरपालिका, अमरावती.

४) "परवाना" म्हणजे या उपविधीखाली मंजुर करण्यात आलेला परवाना.

५) "परवाना अधिकारी" म्हणजे महानगरपालिका आयुक्त किंवा या कामी प्रधिकृत केलेला अन्य कोणताही महानगरपालिकेचा अधिकारी.

६) "परवाना शुल्क" म्हणजे कोणत्याही प्रकारचा परवाना मंजुर, करण्यासाठी आयुक्तांनी वेळोवेळी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ खाली ठरवलेले शुल्क.

७) "परवाना धारक" म्हणजे जी व्यक्ति या उपविधी खाली परवाना धारण करील ती व्यक्ति.

८) "व्यक्ति" म्हणजे वय १८ वर्ष पुर्ण झालेली व्यक्ति.

९) "मटन" म्हणजे मानवी वापरासाठी उद्देशित असलेले कोणत्याही प्राण्याचे किंवा पक्ष्याचे किंवा मासळीचे मास.

१०) "दुकान" यात अंतर्भूत आहे कोणतीही इमारत, गाळा, खोली, कार्यालय किंवा कोणतीही जागा किंवा जागा बंदिस्त किंवा उघडी जेथे मटन किंवा मासळी यांची विक्री करतात किंवा विक्रीसाठी ठेवतात अशी शहरातील महानगरपालिका किंवा खाजगी बाजापेठ किंवा बाजारपेठे बाहेरील कोणतीही जागा.

११) " कत्तलखाना" या उपविधींच्या तरतुदीखाली रितसर प्रधिकृत केलेल्या कोणत्याही जागेत किंवा प्रधिकृत केलेल्या मानवी आहारासाठी असलेल्या कोणत्याही प्राण्यांची कत्तल केली जाते की ज्या जागेचे परिक्षण महानगरपालिका करत असेल त्यास कत्तलखाना संबोधण्यात येईल.

१२) " बाजार" ज्या कोणत्याही जागेत, मग तेथे खरेदीदार व विक्रेते एकत्र जमण्याबाबत कोणत्याही सर्वसाधारण नियम नसला तरी आणि तसेच, अशा जागेच्या मालकाकडुन किंवा कोणत्याही इतर व्यक्तिकडुन बाजारात चालणाऱ्या धंद्यावर किंवा तेथे येणाऱ्या व्यक्तिंवर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येवो वा न येवो- प्राणी किंवा प्राण्यांचे मास, मासळी, मानवी खाद्यासाठी असलेली जनावरे किंवा मानवी खाद्यासाठी असलेले कोणतेही पदार्थ यांची विक्री करण्याकरीता किंवा ती विक्रीसाठी ठेवण्याकरीता लोक, जागेच्या मालकाच्या संमतीने किंवा संमतीवाचून ज्या जागी जमतात अशा जागेचा समवेश होतो.

१३) "उपद्रव" या संज्ञेत, ज्याच्या योगे डोळे, नाक किंवा कान यांच्या शक्तिस इजा, धोका,त्रास किंवा पीडा होते किंवा होण्याचा संभव आहे किंवा जे जिवितास घातक किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस हनिकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे, अशा कोण्त्याही कृतीचा, अकृतीचा,जागेचा किंवा वस्तुचा समावेश होतो.

१४) "जनावरे" याचा अर्थ, अनुसुचीच्या भाग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जनावरांपैकी कोणतेही जनावर,असा आहे.

१५) "पक्षी" याचा अर्थ, अनुसुचीच्या भाग २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पक्ष्यांपैकी कोणतेही पक्षी, असा आहे

१६) "कलम" म्हणजे उपविधीचे कलम.

१७) "विहीत" याचा अर्थ, नियमान्वये विहीत केलेला, असा आहे.

## ब) शब्द व उच्चार

या उपविधीमध्ये वापरण्यात आलेल्या ज्या शब्दाचा किंवा वाक्यसमुहाचा स्वतंत्र व्याख्या देण्यात आलेल्या नाहीत, अशा सर्व शब्दाचे आणि शब्द समुहांचे त्यांना कायद्यात जो अर्थ लावणेत आला आहे तोच त्यांचा अर्थ गृहीत धरण्यात येईल.

# भाग - दोन

## २.१ परवान्याची कार्यपद्धत

अ) आयुक्त लक्षात घेतील प्रत्येक महानगरपालिका किंवा खाजगी कत्तलखान्यांची शहरातील इतर कोणत्याही जागेच्या योग्य योग्यतेची, क्षमता, कोणत्याही महानगरपालिका किंवा खाजगी कत्तलखान्यातील किंवा ज्या जागेवर मटन विक्री करण्यास दरवर्षी द्यावयाच्या परवाना संख्येबाबत निर्णय घेतील आणि त्याकरीता अर्ज मागवतील. जाहिरातीव्दारे ज्या दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द होतील, आणि अशा जाहीरातीचीं एक प्रत महानगरपालिका मुख्यालय प्रभाग कार्यालय, बाजार व परवाना विभाग आणि सर्व महानगरपालिका कत्तलखान्यात व बाजारात चिकटविण्यात येईल.

ब) कोणतीही व्यक्ति ज्यास अमरावती शहरात मटन विक्री करावयाची आहे तो वरील "अ प्रमाणे" प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील विहीत कालावधीत आणि आयुक्तांनी विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करु शकेल.

### क) महानगरपालिका बाजारातील दुकानाचे वाटप -

१) जेव्हा कधीही एखादा नविन पालिका बाजार उघडण्यात येतो किंवा अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका बाजारातील दुकाने रिकामे होतात, तेव्हा आयुक्त हे पालिका बाजारातील दुकानाचे वाटप करण्याकरीता अर्ज किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या जाहीरातीव्दारे मागवतील अशा जाहीरातीची प्रत महानगरपालिका मुख्यालयात आणि सर्व महानगरपालिका बाजारात प्रदर्शित करण्यात येईल.

२) वरील (१) प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीनंतर महानगरपालिका बाजारातील दुकानांची इच्छा प्रदर्शित करणाऱ्या व्यक्तिने आयुक्तांना विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे.

३) वरील (१) प्रमाणे प्रसिध्द केलेल्या जाहिरातीला प्रतिसाद म्हणून समान किंवा वाटप करावयाच्या दुकानांच्या संख्येपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास प्रत्येक अर्जदाराला या उप-विधीच्या तरतुदीखाली महानगरपालिका बाजारातील दुकानाचे वाटप करण्याचे येईल. आयुक्त वेळोवेळी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने विहीत केलेल्या दराने भाडे भरल्यास आणि जेव्हा प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाटप करावयाच्या दुकानांच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास दुकान मिळविण्याचा हक्क लिलावाव्दारे ठरविण्यात येईल. ज्यात फक्त अर्जदारास बोली व बोलणेची परवानगी राहील.

४) कोणतेही कारण दिल्याशिवाय लिलाव रद्द करण्याचा हक्क आयुक्तांकडे राखीव राहील.

५) आयुक्तांच्या स्वेच्छधिन ठरावीक दुकाने राखीव असतील व ही दुकाने जे उद्योजक किंवा दुकानदार याची महानगरपालिका विकास कार्याकरीता त्याच्या धंद्याचे जागेवरुन दुसरीकडे हलविण्यात येणार आहे. त्यांना वाटप करण्याचे अधिकार आयुक्तांना असतील.

### ड) महानगरपालिका बाजारातील दुकानाकरीता परवाना

१) महानगरपालिका दुकान वाटप करण्यात आलेल्या कोणतीही व्यक्ति विहीत केलेल्या नमुन्यात परावाना अधिकाऱ्याकडे सदर बाजारात कोणत्याही प्रकारच्या वस्तुंची विक्री करणे किंवा विक्रीकरीता ठेवणे ज्या ठेवण्याची किंवा विक्रीची परवानगी आहे अशासाठी अर्ज करेल.

२) विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करणाऱ्या अर्जदारास त्याने विहीत शुल्क ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये) ना परतावा भरल्यास परवाना अधिकारी विहीत नमुन्यात परवाना देईल.

**२.२ दैनिक परवाना**

अ) वरील २.१ नुसार जो कोणी व्यक्ति पात्र नसेल किंवा इच्छुक नसेल. तेव्हा परवाना अधिकारी दुकानातील रिकाम्या जागेचा वापरसुध्दा वस्तुंची विक्री करण्याकरीता करु देईल. ज्या रोज तत्वावर अशा बाजारात विक्री केल्या जातील.

ब) अशा रिकाम्या जागेचा वापर करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस रोज तत्वावर परवाना अधिकारी यांना रोज परवाना शुल्क दिल्यास रोज रु १००/- ( ना परतावा) तात्पुरता परवाना प्राप्त होवू शकेल. परंतु सदर परवाना अनुसुची भाग तिन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जागेसाठी असेल.

**२.३ परवाना हस्तांतरणीय नाही**

अ) या उपविधीखाली दिलेला परवाना किंवा नुतनीकरण केलेला परवाना हस्तांतरणीय नाही. परंतु परवानाधारकाने नेमलेले सर्व नोकर किंवा अभिकर्ता किंवा प्रतिनिधीच्या नावाचा उल्लेख परवान्यामध्ये केला असेल त्यांनाही परवानाधारक समजावे किंवा समजले जाईल.

जर परवानाधारक मृत झाल्यास त्याचे कायदेशीर वारस सदर परवाना त्यांचे नावाने हस्तांतरीत करुन घेण्यास पात्र किंवा ते त्या परवान्याचे हक्कदार असतील.

ब) कोणताही परवानाधारक त्याचे दुकान किंवा दुकानाचा पोटभाग भाडयाने देऊ शकणार नाही. या उपविधीचे उल्लंघन करुन किंवा भंग करुन परवान्याचे हस्तांतरण केल्यास परवाना रद्द करुन शुल्कासह प्रतिभूती ठेव जप्त केले जाईल. परवाना रद्द केल्यामुळे जे काही उपजिविकेचे साधन नुकसान होईल त्याबाबत कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईचा हक्क महापालिकाकडे दाखविता येणार नाही.

**२.४. परवान्याचे नुतनीकरण**

अ) जो पर्यंत परवाना धारकाचे वर्तन समाधानकारक आहे म्हणजे त्याने त्या उपविधीचे किंवा उपविधीमधील शर्तीचे उल्लंघन किंवा भंग केलेला नाही. तोपर्यंत परवानाधारक तितक्या कालावधीसाठी परवान्याचे नुतनीकरण करुन देता येईल.

ब) जर एखादा परवानाधारक त्याचा परवाना नुतनीकरण करण्यास उत्सुक नसेल तर ही बाब त्याने पंधरा दिवस अगोदर परवाना अधिकारींकडे लेखी स्वरुपात कळविली पाहिजे व त्यानंतर जर यासाठी अधिक अर्ज आले तर या उपविधीच्या अधिन राहुन सदर परवान्याचा लिलाव करण्यात येईल.

क) परवाना एका वर्षासाठी दिला जाईल व वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपुष्टात येईल. परवाना नुतनीकरणाचा अर्ज प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या पहिल्या दिवसाच्या पुर्वी करावयाचा आहे. ३१ मार्चपुर्वी नुतनीकरणाचा अर्ज परवाना शुल्कासह केलेला नसल्यास दिरंगाई शुल्क रु. २० प्रति दिवसाप्रमाणे आकारण्यात येईल आणि अशा नुतनीकरणाचा अर्ज ३० सप्टेंबर पुर्वी करण्यात आले नाही तर परवानाधारकास नविन परवान्यासाठी अर्ज करावा लागेल.

# भाग - तिन

## ३.१. परवाना धारण केलेल्या परवानाधारकाची कर्तव्य

**अ)** परवान्यासाठी सर्व प्रकारच्या शर्ती योग्य त्या फेरफाराने लागू होतील. परवानाधारकाने जर परवान्यासंबंधीच्या शर्तीचे व अटीचे उल्लंघन केल्यास व तसे निदर्शनास आल्यास परवाना अधिकारी कोणत्याही वेळी परवाना धारकास एक महिन्याचा अगाऊ नोटीस देऊन त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन परवाना रद्द करु शकेल.

१) त्याचा परवाना दुकानात ठळकपणे दिसेल अशा जागी लावला पाहिजे.

२) त्याचे दुकान आणि बसण्याची जागा नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजे.

३) महानगरपालिकाचे परवाना अधिकारी दुकानाचे निरीक्षण करण्यासाठी आल्यास त्यांना सहकार्य करावे.

४) स्वत: धंदा करणारी व्यक्ती किंवा ज्यांचे नाव वेळोवेळी परवान्यामध्ये सहाय्यक म्हणुन आहे किंवा त्याची सदर परवान्यात नोंद केली आहे व ज्या सहाय्यक नोकर किंवा अभिकर्ता यांनी परवाना धारकास लागू असलेल्या सर्व शर्तीचे पालन करण्याचे बंधन राहील.

५) परवानाधारक, सहाय्यक, नोकर किंवा अभिकर्ता ज्यांची नोद परवान्यामध्ये असेल जे प्रत्यक्ष व्यवसाय करीत असेल, त्यांनी आपल्याजवळ स्वत: चे आरोग्य प्रमाणपत्र बाळगून ठेवले पाहिजे.

६) परवान्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या कोणत्याही वस्तू व्यतिरीक्त त्यामध्ये नमूद केलेल्या संख्येपेक्षा जास्त वस्तू विक्रीस ठेवता येणार नाही.

७) कोणत्याही प्रकारचा केरकचरा, कातडे किंवा निरुपयोगी भाग बाजारामध्ये आणणार नाही किंवा सभोवताली फेकणार नाही.

८) महानगरपालिकेने उपलब्ध केलेल्या पाण्याचा सुविधेचा दुरुपयोग अथवा अपव्यय करणार नाही.

९) परवानाधारक त्याच्या दुकानाच्या पुढच्या बाजुस एक योग्य आकाराचे विभाजन किंवा योग्य आकाराचा पडदा लावण्याची व्यवस्था करील की, ज्यामुळे त्याच्या दुकानात ठेवलेले पदार्थ बाजुने जाणाऱ्या लोकांच्या दृष्टीस पडणार नाही.

१०) विनिर्दिष्टीत जागेत जो ज्या कारणाकरीता राखीव आहे, ती जागा सोडून इतर जागी कोणतीही विक्री करणार नाही.

११) दुकानामध्ये कोणतेही फेरफार करणार नाही, कोणतीही भर घालणार नाही, दुकानात किंवा दुकानाच्या दरम्यान कोणतेही बांधकाम करणार नाही.

१२) महापालिका आयुक्तांच्या लेखी परवानगी शिवाय परवानाधारक त्याच्या दुकानाचा गोदाम म्हणून किंवा साठा करण्याची जागा किंवा घाऊक वापरासाठी वापरणार नाही.

१३) कत्तल केलेली जनावरे किंवा मासाचे तुकडे महापालिका कत्तलखान्यातील किंवा प्रधिकृत परवानाधारक पुरवठादाराकडून विकत घेईल.

१४) अधिकृत कत्तलखान्यात पासींग झालेल्या जनावरांचीच मास विक्री परवाना धारकास करावी लागेल.

१५) कत्तल केलेले प्राणि, जनावरांचे मास अथवा मासाचे तुकडे बंद हातगाडीतून परवानाधारक त्याच्या/तिच्या दुकानात आणेल.

१६) विक्री योग्य नसलेले मटन किंवा मासळी विक्रीकरता ठेवणार नाही किंवा विकणार नाही.

१७) परवानाधारक खरेदीदारास आकृष्ठ करण्याकरीता घंटेचा, ध्वनीक्षेपकाचा किंवा आवाजी साधनांचा वापर करणार नाही.

१८) परवानाधारक त्याच्या दुकानामध्ये किंवा दुकानाजवळ कचरापेटी ठेवेल आणि तिचा वापर दररोज दुकानातील केरकचरा, हाडांचे तुकडे, शिळे मास व तत्सम इतर निरुपयोगी वस्तू साठविण्याकरीता करेल आणि अशा साठविलेल्या वस्तू जवळच्या महानगरपालिका कचराकुंडीत, गाडीत अथवा डेपोत रिकाम्या करण्याची व्यवस्था करेल.

१९) कुत्रे, मांजरी अथवा इतर पाळीव प्राण्यांना त्यांच्या दुकानात शिरु न देण्याची काळजी परवानाधारक घेईल.

२०) परवानाधारकाने दुकानात विक्रीसाठी ठेवलेले मासाचे तुकडे अथवा भाग टांगण्याकरीता पुरेशा संख्येने लोखंडी (स्टेनलेस स्टिल) बार अथवा हुक याची व्यवस्था करील.

२१) परवानाधारक त्याच्या दुकानाचा राहण्याचा म्हणुन वापर करणार नाही.

२२) परवाना मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत तो त्याच्या व्यवसायाला सुरुवात करील.

२३) कोणत्याही दुकानाचा परवानाधारक किंवा भोगवटदार किंवा त्याचा नोकर यांनी त्यांच्या दुकानात परवानगी दिलेल्यापैकी कोणताही माल वस्तु किंवा भविष्यकाळासाठी आगाव तरतूद म्हणून जो काही माल किंवा वस्तुचा साठा विक्रीसाठी ठेवला जाईल ज्या वस्तु किंवा त्यांचा भाग दुकानाच्या बाहेर किंवा पुढे येणार नाही जेणेकरुन बाजारात फिरण्यास इतरांना अडथळा होणार नाही.

२४) परवाना अधिकाऱ्याच्या मते बाजारातील जागेमध्ये अडथळा निर्माण होत असेल किंवा दुकानात अति गर्दी होत असेल किंवा त्यामुळे स्वच्छ हवा बाजारात खेळती राहू शकत नसेल अशा वेळी परवाना अधिकारी कोणत्याही परवानाधारकाला किंवा भोगवटधारकाला त्याचे दुकान योग्य अशा जागेमध्ये हलविण्यास निर्देश करील.

२५) परवानाधारक बाजारातील अधिन असलेले जोडरस्ते व अंतर्गत भाग योग्य ती देखभाल करुन सुव्यवस्थित ठेवेल विशेषत: गटर व जमिनीवर पाणी अथवा त्यासारखे पदार्थ साचणार नाही याची दक्षता घेईल.

**ब) खाजगी जागेत परवाना धारण केलेल्या परवानाधारकाची कर्तव्य -**

वरील "**अ**" मध्ये विनिर्दिष्ट सर्व प्रकारच्या अटी व शर्ती योग्य त्या फेरफाराने खाजगी जागेत परवाना धारण केलेल्या परवानाधारकास सुद्धा बंधनकारक राहील. परवानाधारकाने जर परवान्या संबंधीचे अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास व तसे निदर्शनास आल्यास परवाना अधिकारी कोणत्याही वेळी परवानाधारकास ७ दिवस अगावू नोटीस देऊन त्याचे म्हणने मांडण्याची संधी देऊन परवाना रद्द करु शकेल.

१) आपले दुकान सुस्थितीत ठेवील.

२) परवाना अधिकाऱ्याने मान्य केलेल्या आकाराची आणि स्वरुपाची कचरापेटी त्याच्या दुकानात किंवा त्याच्या दुकानाजवळ ठेवील आणि टाकाऊ पदार्थ, जमिनीवरील केरकचरा, हाडाचे तुकडे, निरुपयोगी मास आणि यासारख्या अन्य टाकाऊ वस्तु टाकण्यासाठी तिचा वापर दररोज करण्यात येईल आणि अशी साठवण झालेली सामुग्री दररोज किंवा अल्प कालांतराने आवश्यक असेल तर, परवाना अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या जवळच्या महानगरपालिका आगारामध्ये रिकामी करण्याची व्यवस्था करेल.

३) दुकानामध्ये पॉलीश केलेल्या तंदूर दगडाचा किंवा पॉलीश केलेला शहाबादी दगडाचा किंवा पॉलीश केलेल्या संगमरवराचा पृष्ठभाग असलेल्या विटांचा एक चबुतरा उभरलेला असेल. असा चबुतरा परवाना अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा आकाराचा असेल.

४) दुकानाच्या तळजमिनी फरसबंदी पॉलीश केलेल्या शहाबादी दगडाने किंवा संगमरवराने किंवा टाईल्सने करवून घेतली पाहिजे.

५) दुकानातील चबूतऱ्यापुढील बाजू आणि दुकानाच्या भिंती तळजमिनीच्या पृष्ठभागापासून चार फुटापर्यंत चमकदार टाईल्सने फरसबंद करण्याची व्यवस्था करील आणि चबुतऱ्याचा किंवा भिंतीचा उरलेला भाग दरवर्षी तेलरंगाने (ऑईल पेंटने) रंगविण्याची व्यवस्था करेल.

६) दुकानातील लाकडी काम आणि छत तैलरंगाने (ऑल पेंटने) रंगविण्याची व्यवस्था करेल.

७) परवाना अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे किंवा विनिर्दिष्ट आकारमानाचे कोनब्लिडर मध्येच पक्ष्यांची कत्तल परवानाधारक करील.

८) दुकानात पुरेशी हवा खेळती राहील याची खात्री करुन घेईल आणि प्रत्येक खिडकीला आणि संवातकाना (व्हेन्टीलेटर) योग्य पडद्याची किंवा परवाना अधिकाऱ्याकडून फर्माविण्यात येईल त्याप्रमाणे तारांची विणलेली उच्च प्रतीची जाळी लावण्याची व्यवस्था करील.

९) परवाना अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेला आकाराची, पाण्याचा नळ असलेली "न्हाणी" किंवा धुण्याची जागा याची तरतूद करील.

१०) विक्री करण्याचा दृष्टीने ठेवण्यात येणारे मटन हे मोकळ्या किंवा खुल्या प्रकाशात व हवेस उघडे ठेवता येणार नाही. परंतु ते सुव्यवस्थित सुरक्षित ठिकाणी ठेवावे की ज्यामध्ये जिवजंतुचा धुळीचा प्रादुर्भाव होणार नाही, अशा दर्शक कपाटात किंवा दर्शक मांडणीमध्ये ठेवेल.

## भाग - चार

### ४.१ साफसफाई, स्वच्छता व सुरक्षा

महानगरपालिका बाजार किंवा खाजगी दुकान किंवा दुकानाचा भोगवटदार परवाना धारकास पूर्वगामी उपविधीसह पुढीलप्रमाणे दर्शविलेल्या नियमामध्ये निर्धारीत केलेल्या शर्तीचे पालन करावे लागेल.

**अ) दुकानाची साफसफाई व स्वच्छता -**

१) परवानाधारकाने किंवा भोगवटदाराने त्याचे दिवसभराचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचे दुकान स्वच्छ करण्याची आणि दररोज दुकान जंतु विरहीत करण्याची व्यवस्था करील तथा दुकानासमोरील आणि दुकानालगतचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवील.

२) परवानाधारकाने दुकानातील कोणत्याही प्रकारचा केरकचरा निर्देशित केलेल्या वेळेव्यतिरीक्त बाहेर टाकता येणार नाही. परंतु अशा प्रकारचा केरकचरा ठेवण्यात आलेल्या कचराकुंडीत किंवा परवाना अधिकारी यांनी निर्देशित केलेल्या जागीच टाकावा, जेणेकरुन बाजाराची स्वच्छता करणाऱ्यांना ती उचलण्याच्या दृष्टीने सोईचे असेल.

३) बाजारातील आवारात एकत्रित गोळा केलेला केरकचरा महापालिकेची मालमत्ता राहील.

**ब) बाजारातील कामकाजाची वेळ -**

बाजार प्रत्येक दिवशी सकाळी ६.०० ते सायंकाळी ८.३० वाजेपर्यंत किंवा महापालिकाचे परवाना अधिकारी वेळोवेळी सदर बाजार केन्द्राची वेळ जाहीर नोटीसोव्दारे निर्देशित केलेल्या वेळेमध्ये राहील. परंतु ज्यावेळी बाजारातील एखाद्या भागाचे किंवा विशेष दुरुस्ती करावयाची असेल किंवा महापालिकेस आवश्यक वाटल्यास तो भाग रिकामा करुन घेतला जाईल अशावेळी परवाना धारकाचे कोणत्याही प्रकारची भरपाई महापालिका देणार नाही किंवा परवाना धारकास हक्क दाखवता येणार नाही.

**क) चरबीयुक्त किंवा तेलकट बांबु किंवा कपडे इत्यादीस दुकानात वापण्यास मनाई**

कोणत्याही परवाना धारकास त्याच्या दुकानात मळकट कपडे, दोरी किंवा दोर, घाणेरडी चटाई किंवा गोणपाट, चरबीयुक्त बांबु किंवा इतर कोणतीही वस्तु की ज्यामळे त्याच्या दुकानात जिवजंतु व माशा आकर्षित होतील अशा वस्तु दुकानात वापरण्यास मनाई राहील.

**ड) साहित्याची साफसफाई व स्वच्छता :**

परवानाधारकाने दिवसभऱ्याचा व्यापार संपल्यानंतर किंवा दुकान बंद करण्यापुर्वी दुकानातील मटन कापण्याचे लाकडी ठोकळा, सुऱ्या, कोनक्लीडर इत्यादीचे निर्जतुकीकरण केले पाहिजे.

**४.२ सांसर्गिक संक्रमक रोगाने बधित व्यक्तिस व्यवसाय करण्यास मनाई.**

ज्या व्यक्तिस मोठी जखम किंवा महारोग किंवा संकुरमक किंवा सांसर्गिक आजार झाला असेल तर त्या व्यक्तिला परवाना अधिकारी त्या व्यक्तिचा आजार किंवा फोड दुरुस्त होत नाही तोपर्यंत त्यास त्याचा व्यवसाय करण्यात प्रतिबंध करु शकेल.

**४.३. आगीवरील नियंत्रण**

अ) परवानाधारक किंवा भोगवटदार किंवा परवाधारकाचा नोकर यांनी बाजारातील आपले दुकान कोणत्याही वेळी बंद करण्यापुर्वी दुकानातील कोणत्याही प्रकारचे अग्निजन्य साहित्य बंद केल्याची खात्री करावी.

ब) बाजारातील कोणतीही व्यक्ति आग पेटविणे किंवा अर्धवट जळालेला कोळसा जळता ठेवणे किंवा कोणत्याही प्रकारची आग की ज्यामुळे इमारतीला किंवा दुकानाला धोकादायक ठरु शकेल अशी कोणतीही कृति करणार नाही.

क) परवानाधारकाने आपल्या दुकानात परवाना अधिकारी ठरवून देईल त्या निकषानुसार अग्निशमन उपकरणांची व्यवस्था केली पाहिजे.

**४.४ परवाना अधिकाऱ्यांचे आज्ञपालन करणे**

बाजारातील प्रत्येक परवानाधारक किंवा त्यांचा नोकर यांचेवर परवाना अधिकारी याने उपरोक्त भाग ४ अंतर्गत वेळोवेळी काढलेल्या कायदेशिर आदेशाचे पालन करणे परवाना धारकास बंधनकारक राहील परंतु अशा आदेशाविरुध्द आयुक्तांकडे अपिल करण्याचा परवाना धारकास अधिकार राहिल. या अंतर्गत आयुक्तांचा निर्णय अंतिम तथा बंधनकारक राहील.

### ४.५ बाजार बंद ठेवणे

एखाद्या साथीच्या रोगांचा उद्रेकाचे प्रसंगी परवाना अधिकाऱ्याच्या मते बाजार किंवा दुकाने उघडे ठेवल्यास साथीच्या रोगाचा प्रादुर्भव होईल अशावेळी परवाना अधिकारी ठरविल त्या कालावधीसाठी परवानाधारक त्याचा व्यवसाय बंद करील. व्यवसाय बंद ठेवल्याने परवाना धारकाचे जे काही नुकसान होईल त्याबाबत कोणत्याही प्रकारचे नुकसान भरपाई देण्याचे महापालिकेस बंधनकारक राहणार नाही.

## भाग पाच

### ५.१. कत्तलकाखान्यातील नियंत्रण व देखरेख

प्रत्येक महापालिका कत्तलखाना व प्रत्येक खाजगी दुकान महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८६ खाली परवाने दिले जातील व या अधिनियमाच्या अधिन राहून हे कत्तलखाने परवाना अधिकाऱ्याच्या निरीक्षणाखाली व सर्वसाधारण देखरेखीखाली राहतील.

### ५.२. जनावरांचे भरावयाचे प्रवेश शुल्क व कत्तल शुल्क

अ) महानगरपालिका कत्तलखान्यात कोणत्याही व्यक्तिला स्थायी समितीने वेळोवेळी ठरविलेले कत्तलशुल्क भरल्याशिवाय जनावरांची कत्तल करता येणार नाही.

ब) जे कोणी व्यक्ति जनावरांची कत्तल करण्यासाठी जनावरे कत्तलखान्यात आणतील, त्या प्रत्येक व्यक्तिंनी आप आपली जानावरे स्वच्छ करण्याची किंवा स्वच्छ ठेवण्यासाठी ते जबाबदार राहतील.

क) जनावरांनी एकमेकांना मारु नये म्हणून जनावरांना दोराने बांधून ठेवण्याची काळजी जनावरांचे मालक घेतील.

ड) जनावरांची कत्तल करण्यापुर्वी त्यांना किमान १२ तासांची पुरेशी विश्रांती दिली पाहिजे.

### ५.३. जनावरे कत्तल करण्याबाबतची तरतूद

अ) कोणत्याही व्यक्तिने अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या जनावरांना कत्तलखान्यात प्रवेश मिळण्यापुर्वी कत्तलखाना नियम २००० महाराष्ट्र प्राणि रक्षण कायदा १९७६, महाराष्ट्र प्राणि रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ यान्वये परवाना अधिकारी किंवा प्रधिकृत केलेला अन्य अधिकारी हयांचेकडून आपल्या जनावरांची कत्तलपुर्व तपासणी करुन घेतली पाहिजे. कत्तलपुर्व तपासणीमध्ये कत्तलीस अयोग्य असलेल्या जनावरांसंबंधी सक्षम अधिकारी त्यांच्या आयोग्यतेबाबतची कारणे प्रमाणपत्रात नोंदवतील अशी जनावरे संबंधित मालकाने त्वरीत कत्तलखान्याच्या परिसरातून बाहेर नेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**ब) पुढील पैकी कोणताही प्राणी किंवा प्राण्यांचा वर्ग यांचे प्रमाणपत्र**

१) सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ज्याची कत्तल करणे आवश्यक आहे, असा दाखला उपविधी खाली प्रधिकृत केलेल्या पशुशल्यचिकित्सकाकडून देण्यात आला असेल असा प्राणी:

२) सांसर्गिक व इतर प्राण्यांना धोकादायक असल्याचे पशुशल्यचिकित्सकाकडून प्रमाणित करण्यात आले असेल असा कोणताही रोग जडलेला प्राणी.

परंतु असे की या पोटकलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्राण्याच्या कत्तलीसाठी सक्षम अधिकाऱ्याकडून लेखी प्रमाणपत्र मिळवण्यात आल्याखेरीज अशी कत्तल करण्यात येणार नाही किंवा करविण्यात येणार नाही.

क) कोणत्याही व्यक्तिस, आयुक्त किंवा या उपविधि खाली प्राधिकृत केलेल्या अधिकारी ह्यांच्या लेखी परवानगी शिवाय, मानवी आहारासाठी असलेली अनुसुची १ मधील जनावरे किंवा या उपविधीन्वये चालविण्यात येत नसलेल्या किंवा अनुज्ञप्ती न दिलेल्या कोणत्याही कत्तलखान्यात किंवा जागेत कत्तल केलेल्या अशा कोणत्याही जनावरांचे मास वरीलप्रमाणे पुर्व परवानगी शिवाय शहरात आयात करता येणार नाही.

### ५.४. जनावरांचे कत्तल करण्याचे वेळापत्रक

सक्षम प्रधिकारी वेळोवेळी प्रत्येक कत्लखान्याच्या सुचनाफलकावर सुचना पत्राकाव्दारे निर्देशित करेल त्यावेळे व्यतिरिक्त कोणतीही व्यक्ती मानवाचे आहारासाठी जनावरांची कत्तल करु शकणार नाही.

### ५.५ कत्तलीसाठी प्रवेश देण्यास जनावरांच्या संख्येवर मर्यादा

कोणताही इसम कत्तलखान्यात परवाना अधिकारी यांनी जनावरांचा ठरवुन दिलेल्या संख्येपेक्षा जादा जनावरांना कत्तलखान्यात अणणार नाही अथवा प्रवेश देता येणार नाही अशी ठरवून दिलेल्या जनावरांची संख्या जाहिर केली जाईल.

### ५.६. कत्तल करण्याची हत्यारे

कोणताही इसम कत्तलीसाठी वापरण्यात येणारा चाकू अथवा सुरा कत्तल करण्याचे दिवशी किंवा कत्तलीस प्रारंभ करण्यापुर्वी स्वच्छ केल्याशिवाय वापणार नाही.

### ५.७ टाकाऊ पदार्थ हटावणे

परवाना अधिकाऱ्याने पुरविलेल्या कचरा टाकण्याच्या कचरा कुंडया व्यतिरिक्त इतर ठिकाणी केरकचरा किंवा रक्त टाकू नये व कोणीही कचराकुडया कचरा टाकण्यासाठी लागणाऱ्या वेळे व्यतिरिक्त उघडे ठेवू नये.

### ५.८. कत्तलखान्यातील वस्तु वेळीच हटविल्या नाही तर ते महापालिकेची मालमत्ता म्हणून जमा होईल

महापालिका कत्तलखान्यामध्ये कत्तल केलल्या जनावरांची कातडी टाकाऊ भाग किंवा प्राण्यांचे इतर भाग किंवा इतर वस्तु जर कत्तलखाना बंद करण्यापुर्वी काढून घेतले नाही तर ते महापालिकेची मालमत्ता म्हणुन जमा होतील.

**५.९. कत्तलखान्याकडे मटन पाठविणे**

परवाना अधिकाऱ्याने मान्य केलेल्या किंवा परवानगी देईल त्या भांडयामध्ये किंवा पात्रामधे व त्यावर स्वच्छ आवरण किंवा झाकणाने बंद करुन दृष्टिपथात पडणार नाही किंवा माशांचा शिरकाव होणार नाही अशा पध्दतीशिवाय कोणतीही व्यक्ती कत्तलखान्याच्या बाहेर मटन घेऊन जाणार नाही.

**५.१० कत्तलखान्यात मुलासह प्रवेशास मनाई**

कोणताही इसम १४ वर्षाखालील मुलांसह अथवा मुलाला घेऊन कत्तलखान्यात प्रवेश करणार नाही.

**५.११. कत्तलखान्यातुन बाहेर घालविण्याची अधिकार**

कोणताही व्यक्ती गैरवर्तन किंवा या उपविधीचे उल्लंघन किंवा भंग करेल किंवा पालिकेच्या अधिकाऱ्याला किंवा नोकरला त्याचे कायदेशिर काम करत असतांना अडथळा निर्माण करेल, त्यावेळी परवाना अधिकारी आदेश काढून अशा व्यक्तिला कत्तलखान्याच्या आवारामध्ये येणास मनाई करेल किंवा आदेशामध्ये नमुद केलेल्या कालावधीसाठी परवाना अधिकारी तितक्या कालावधीसाठी कत्तलखान्यात येण्यास त्यास बंधन घालतील. परंतु याबाबत अशी व्यक्ती आयुक्ताकडे दाद मागू शकेल.

**भाग - ६**

**६.१ परवाना देता येणार नाही अशी प्रकरणे जर परवाना अधिकारी यांची अशा खात्री होण्याबाबत कारण असेल की —**

अ) दुकान सुरु करण्याचा उद्देश आहे अशी जागा कोणत्याही धार्मिक स्थळापासून किंवा शाळेपासून किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेपासून १०० मिटर त्रिज्येच्या परिसरात असेल,

ब) दुकानासाठी निवडलेली जागा, त्यावेळी अंमलात असलेल्या विकास नियंत्रण उप-विधीनुसार निश्चित केलेले क्षेत्र नसेल,

क) दुकानासाठी निवडलेली जागा कोणतेही इस्पीतळ पासून दहा मिटर अंतरावर स्थित असेल,

ड) अर्जदाराकडे महानगपालिकेच्या कोणत्याही देण्याची थकबाकी असेल,

ई) अर्जदार सज्ञान वयाचा झालेला नसेल तर परवाना अधिकारी अशावेळी परवान्याचा अर्ज नामंजूर करतील. अशाप्रकारे अर्ज नामंजुर झाल्याची कारणे परवाना अधिकारी याने संबंधित व्यक्तिस कळविली पाहिजे.

**भाग ७**

**७.१ परवाना निलंबित करणे किंवा रद्द करणे.**

**१) जर परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यास असे मानण्यास संयुक्तिक कारण असेल की,**

अ) कोणत्याही परवानाधारकाने विपर्यास करुन किंवा लबाडी करुन परवाना मिळविला आहे किंवा

ब) ज्या निर्बंधाच्या आणि शर्तीच्या अधिन परवाना देण्यात आलेला आहे. त्यापैकी कोणत्याही निर्बंधाचे व शर्तीचे परवानाधारकाकडून उल्लंघन झालेले आहे किंवा त्याचे पालन करण्यास टाळाटाळ होत आहे.

क) महापालिका बाजार किंवा कत्तलखाना किंवा खाजगी दुकान किंवा मटन विक्री करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या अधिनियमांचा किंवा नियम किंवा उप-विधी यांच्या कोणत्याही तरतुदींचा परवानाधारकाकडून उल्लंघन झाले आहे. तर परवाना देणारा अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी परवाना अधिकारी सदर परवाना निलंबित करील किंवा परवाना रद्द सुद्धा करु शकेल.

२) परवाना निलंबित करण्याचा किंवा रद्द करण्याचा आदेश काढण्यापुर्वी परवाना अधिकारी परवानाधारकास विनिर्दिष्ट कालावधीकरीता परवान्याचे निलंबन का करण्यात येऊ नये किंवा यथास्थितीत उक्त नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा कालावधीत ते रद्द का करण्यात येऊ नये याची कारणे दाखविण्यास फर्माविणारी नोटीस देईल.

३) परवाना अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या वेळेस कारण दाखविण्यास परवाना धारकाने कसूर केल्यास किंवा त्याने दाखविलेल्या कारणांनी परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याचे समाधान झाले नाही तर परवाना अधिकारी विनिर्दिष्ट कालावधीसाठी परवाना निलंबित करता येईल.

४) परवाना निलंबित केल्यानंतर किंवा ते रद्द करण्यात आल्यानंतर अगोदार भरण्यात आलेली परवाना फी व प्रतिभुती ठेवीचे समपहरण करण्यात येईल.

## भाग - ८

### ८.१ शास्ती व निरासन

महापालिकाने कोणतेही सुसंगत नियम किंवा उपविधी बनविले असतील व ते महानगरपालिका क्षेत्रात अंमलात असतील ते ही उपविधी लागू करण्यापूर्वी रद्द होतील मात्र अगोदरच्या उपविधीनुसार काही कारवाई झाली असेल किंवा करावयाची राहीली असेल त्याला ते लागू होणार नाही.

**अ) सर्वसाधारण शास्ती**

कोणतीही व्यक्ति उपविधीमधील भाग ४ व भाग ५ मधील खंड ५.३ वगळता नमूद मधील नियमांचे उल्लंधन करीत असेल की ज्या कृतीमुळे उपद्रव निर्माण होत असेल. अशा व्यक्तिस रु. १०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल व नियमांचे उल्लंघन चालू ठेवील अशा प्रत्येक दिवसाबद्दल रु. १००/- प्रतिदिवस उल्लंघन चालू असेपर्यंत दंड आकारण्यात येईल.

**ब) फौजदारी प्रक्रिया संहिता**

यात काहीही अंतर्भुत असले तरी या उपविधीमधील भाग ५ मधील खंड ५.३ खालील सर्व अपराध हे दखलपात्र असतील.

१) जो कोणी या उपविधीमधील भाग ५ मधील खंड ५.३ मधील कोणत्याही नियमांचा भंग करील त्यास, अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यापर्यंत असेल अशा कैदेची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असेल अशा द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

२) जो कोणी वर उल्लेखीत "ब" नुसार शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील त्याने तो अपराध केला आहे, असे समजण्यात येईल आणि त्यास दोषी ठरवण्यात आल्यानंतर अशा अपराधाबद्दल वर उल्लेखित १ मध्ये तरतूद केलेली शिक्षा देण्यात येईल.

**अनुसुची भाग १**

म्हशी (नर किंवा मादी), वराह, बकरा, मेंढा (नर किंवा मादी)

**अनुसुची भाग २**

कुक्कुट,विदेशी तितर किंवा वाटर, कबुतर, बदक, टर्की, इमू (नर किंवा मादी)

**अनुसुची भाग ३**

या उपविधीखाली महानगरपालिकाने वेळोवेळी आरक्षित केलेली जागा.